


ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२९९३३०

र.जि.नं.ः एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४० दि.२९/०५/२००१


## सन २०२३ - २०२४ चा वार्षिक अहवाल

सस्नेह नमस्कार ......

सर्व सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो ,

**आज** २३ **व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी** आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो. दि.३१/०३/२०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून मोलाचे सहकार्य केले. ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतलेली आहे. संस्थने कठीण निकष लावुन कर्जवाटप , कर्जवसुली व दैनंदिन कामकाज केले आहे. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणुन संस्थेला सलग ६ वर्षे "अ तारांकीत" तर १७ वर्ष "अ" ऑडीट वर्ग मिळालेला आहे. या वर्षी संस्थेने २३ वर्ष पुर्ण केलेले आहे. २३ वर्षाच्या कालावधीत संस्था स्वयंपुर्ण झालेली असुन आर्थिक दृष्टया मजबुत आहे. स्वतःच्या मालकीच्या अद्ययावत भव्य नुतन वातानुकूलीत वास्तुत संगणकीकरणासह RTGS NEFT IMPS SMS QR code अशा ऑनलाईन आर्थिक सुविधासह सुसज्ज अवस्थेत आज ही संस्था आपण पाहात आहोत.

सन २००१ रोजी समाजाने लावलेले हे छोटेसे रोपटे आज त्याचे कल्पवृक्षात रूपांतर झाल्याचा चमत्कार आपण पहात आहोत. चांदवड तालुक्यात अग्रगण्य व शिस्तबध्द, प्रभावी प्रशासन असलेली संस्था म्हणून **महात्मा फुले नागरी सह.पतसंस्थेची** ओळख झालेली आहे. सुरूवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता, पारदर्शकता, तत्परता, विश्वासार्हता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक मंडळाने केलेले आहे. ते केवळ आपल्या बहुमोल सहकार्यामुळे शक्य झालेले आहे. संस्थेच्या नेत्रदिपक प्रगतीत आपला सर्वांचा मोलाचा वाटा आहे. चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था आहे त्यांच्याशी निर्मळस्पर्धा करून, दुष्काळ, आर्थिक मंदी, गारपीट, नोटबदली कोरोना अशा अनेक समस्यांनी ग्रासलेले होते. अशा मोठया संकटाला सामोरी जावुन संस्थेने दरवर्षी उत्कृष्ट कर्ज वसुली केलेली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकार खात्यांने लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरू तरूणांना, सभासदांना, व्यावसायिकांना तालुका स्तरावर कर्जवाटप केले आहे. सभासदांनी देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामुळे आम्ही ९७.००% कर्जवसुली करू शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे. म्हणुन सभासदांना मी धन्यवाद देतो व असेच सहकार्य मिळो अशी आपेक्षा करतो.

दरवर्षी वाढता नफा, वाढत्या ठेवी ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह गोष्ट आहे. आज "**महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था**" ही अंतर -बाहय सुंदर व आर्थिक दृष्टया सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे. या श्रेयाचे मानकरी संचालक मंडळ असले तरी खरे श्रेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे. त्यांच्याच सहकार्यामुळे संस्थापक प्रा. निकम टी.पी. यांच्या स्वप्नांना व प्रयत्नांना मुर्त स्वरूप आले आहे. संस्थेला आजपर्यंतच्या उत्तुंग शिखरावर पोहचविणारे खरे शिल्पकार संस्थापक प्रा. निकम टी.पी. हे आहे.



ऋणातून समृध्दीकडे

महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२९९३३०

र. जि. नं.ः एन एस के/सी. एच. डी/आर. एस. आर/सी आर/८४० दि. २९/०५/२००१

संस्थेच्या प्रगतीचे २३ वर्षाचे (प्रतिबिंब) पत्रक आपणास दिले आहे गेली २३ वर्षापासुन आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे. या वर्षी देखील सस्थेला 'अ' ऑडीट वर्ग मिळालेला असुन वेटेज ॲव्हरेज पध्दतीनुसार १०० पैकी ९५% गुण मिळणारी जिल्हातील सर्वात्कृष्ठ संस्था ठरली आहे. ऑडीट मेमोमध्ये आजपर्यंत कोणत्याही प्रकारच्या आर्थिक व्यवहाराबाबत, व्यवस्थापनाबाबत गंभीर आरोप किंवा दोष नोंदविलेले नाही हे मी अभिमानाने आपणास सांगु इच्छेतो, या सर्व गोष्टींचा तुम्हाला व आम्हाला रास्त अभिमान वाटावा अशी ही बाब आहे. गुणात्मक दृष्टया आपली पतसंस्था चांदवड तालुक्यात नंबर १ आहे हेच आपल्या पतसंस्थेचे खास वैशिष्टये आहे, असेच आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो. संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो. पुनःश्च एकदा आपले मनःपुर्वक हार्दिक स्वागत करून आपल्या शुभेच्छा हृदयाशी बाळगून २३ वा वार्षिक अहवाल आपणापुढे सविनय सादर करीत आहे.

**भागभांडवल :-**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल ५० लाख रूपये असून दि. ३१/०३/२०२४ अखेर संस्थेचे एकुण सभासद संख्या ३१५ असून वसूल भागभांडवल २८,१८,०००=०० रूपये आहे . अहवाल सालात भाग भांडवल रूपये १,३३,५५०=०० ने वाढ झालेली आहे.

**राखीव व इतर निधी :-**

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकुण निधीवरून लक्षात येते. कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि. ३१/०३/२०२४ अखेर संस्थेचा निधी रूपये २,२४,९६,५६१.४० असून अहवाल वर्षात निधीमध्ये रूपये १७,१५,५१९.५५ने वाढ झालेली आहे.

**ठेवी :-**

संस्थेचे पारदर्शी कामकाज व संस्थेवरील दृढ विश्वास यामुळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामुळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी प्रचंड वेगाने वाढ होत आहे. ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे. ठेवीत होणारी वाढ ही सभासद व परिवाराच्या विश्वासाचे प्रतिक आहे. या वर्षाअखेर संस्थेच्या ठेवी रूपये ८,३०,९८,६५१.८२ इतक्या आहे. अहवाल वर्षात ठेवीमध्ये रूपये ७१,११,७०८. ने वाढ झालेली आहे.

ठेवीचां ए. बी. आर रेट हा ६.३३% इतका आहे. सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छिते.

**कर्ज वाटप :-**

संस्थेने व्यापारी, शेतकरी, शेतमजूर, कामगार , मजूर, नोकरवर्ग, उद्योजक इत्यादी सर्व गरजू व होतकरू लोकांना क्रियाशील सर्वसाधारण व नाममात्र सभासदांना कर्ज वाटप केलेले आहे.

कर्ज वाटप करतांना त्यांची विश्वासार्हता व कर्ज परत फेडीची क्षमता या गुणात्मक कसोटीच्या आधारे रूपये ६,४४,५६,७६0.00 इतके कर्ज वाटप केलेल आहे. सदर कर्जाचा ए.एल.आर रेट हा १0.७९% इतका आहे.

**थकबाकी :-**

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थेच्या कामकाजातील सर्वात कठीण काम आहे. परंतु वसुली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. संस्थेचे संस्थापक चेअरमन प्रा. निकम टी.पी.व कार्या-लयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न तसेच सभासदांनी दिलेली मोलाची साथ यामुळे दि.३१/0३/२0२४ अखेर संस्थेने ९७ % इतकी कर्जवसुली केलेली आहे. थकबाकी असलेल्या सभासदांवर कलम ९१व कलम १३८प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. सर्व कर्जदार सभासदांनी नियमित कर्ज भरून संस्थेला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. एन.पी.ए.ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन.पी.ए.चे प्रमाण 0% इतके आहे. संस्थेचा सी.डि.रेशो ६२.00% आहे तो आर्दश असा सी.डि.रेशो आहे. सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी.डी.रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे यापुर्वी पालन केलेले आहे.

**गुंतवणूक :-**

संस्थेने नियोजनपूर्वक व अत्यंत सुरक्षित पध्दतीने रूपये ४,६६,९१,१२३.00 रूपयांची गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचा सी.आर.आर हा ५% व एस.एल.आर हा ३६.७३% इतका आहे. तसेच नियामक मंडळाने लागु केलेला जोखीम भारीत मालमत्ता/जिंदगीशी असलेले प्रमाण CRAR चे प्रमाण ३१.६६% असुन ते आर्दश प्रमाण राखलेले आहे. ते शासनाच्या नियमाप्रमाणे आहे. परंतु संस्थेने केलेल्या गुंतवणुकीवर केंद्रसरकारने १0% टि.डी.एस. कपातीचे आदेश को-ऑफ बॅकांना दिल्यामुळे संस्थेच्या अर्थकारणावर त्याचा प्रतिकुल परीणाम होण्याची भिती आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या ११ सभा झालेल्या असुन संचालकांनी स्वतःची कामे बाजुला ठेवुन संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे म्हणुन संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी आपेक्षा बाळगतो .

**नफा:-**

गुणात्मक कर्ज वाटप व कमाल कर्जवसुल, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला २0,५0,000.00 रूपये निव्वळ नफा झालेला आहे. या वर्षी संस्थेने २0,५0,000.00 रूपयांच्या नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहुन नियमाप्रमाणे सर्व प्रकारच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहे प्रतिवर्षी वाढता नफा संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे .



ऋणातून समृध्दीकडे

## महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.:-२९९३३0
र.जि.नं.: एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४0 दि.२९/0५/२00१

**कर्मचारी परिवार :-**

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम, प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ५कर्मचारी वर्ग लाभलेले आहे. संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होवून निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

**लेखा परिक्षण :-**

संस्थेच्या लेखा परिक्षणावरून संस्थेचे खरे चित्र समजते संस्थेला या पुर्वी ६ वर्ष सतत “अ स्टार” ऑडीट वर्ग मिळालेला आहे. तर १७ वर्ष ‘अ’ ऑडीट वर्ग मिळालेला आहे. या वर्षी वेटेज ॲव्हरेज १00 पैकी ९५%. गुण मिळवून संस्थेने चांदवड तालुक्यात प्रतिष्ठेचे व नंबर एकचे स्थान मिळविले आहे, ही आपणा सर्वांच्या दृष्टीने आभिमानाची गोष्ट आहे.

**आभार :-**

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मा. सहाय्यक निंबधक, सौ. सविता शेळके मॅडम सहकार व बॅकिंग क्षेत्रतील सर्व अधिकारी,तसेच श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदा सल्लागार), संस्थेचे व्हॅल्युअर श्री. अभयकुमार मेहता (मालेगांव), सहकार राजकीय , शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदर्श न केले, भेटी देवून सुचना केल्या त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

॥ जय हिंद...! ॥

आपला स्नेहांकित ,

(मा.प्रा.निकम टी.पी.) चेअरमन



ऋणातून समृध्दीकडे

**महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)**

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२९९३३०

र.जि.नं.ः एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४० दि.२९/०५/२००१

## २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### ❖ फक्त सभासदांसाठीच ❖

**जा.क्र.वा.स.सन.२०२४** **दि.२५/०७/२०२४**

आपल्या पतसंस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची "**वार्षिक सर्व साधारण सभा**" **रविवार दि.११/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. चंद्रभागा बॅक्वेट हॉल चांदवड .** येथे आपल्या संस्थेचे **चेअरमन मा.श्री.प्रा.निकम टी.पी.** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचारविनीमय करण्यासाठी सभा बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

☆ **सभेपुढील विषय** ☆

१) मा.नियोजीत अध्यक्षांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वृत्त वाचून कायम करणे.
३) दि.३१/३/२०२४ अखेरची आर्थिक पत्रके ,ताळेबंद ,नफा - तोटा पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल वाचुन कायम करणे. नफा विगतवारीस मंजुरी देणे बाबत.
४) सन २०२३-२४ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विगतवारीस मंजुरी देणे बाबत.
५) सन २०२३-२४ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या लाभांश वाटणीस मंजुरी देणे बाबत.
६) सन २०२४-२०२५ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे बाबत.
७) सन २०२३-२४ च्या वर्षात अंदाज पत्रका पेक्षा जास्त झालेल्या खर्चाला मान्यता देणे.
८) सन २०२३-२४वर्षाचे ऑडीट मेमोचे वाचन करून तो स्विकारणे व दोष दुरूस्ती करून तो मंजुर करणे.
९) सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणुक करणेबाबत.
१०) उप समितीच्या अहवालावर चर्चा करून तो स्विकारणे बाबत.
११) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणा-या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणेबाबत.
१२) थकबाकी कर्जदारांवर कोर्ट कारवाई करणे व संचालकमंडळ त्यांचे नातेवाईक यांचे कर्जाचे वाचन करणे.
१३) सन २०२३-२०२४मधील भेट वस्तु वाटपास मंजुरी मिळणेबाबत.
१४) मा.अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे बाबत.

**आपले नम्र**

**श्री.सतिश मुरलीधर आहेर**
मॅनेजर

**श्री किशोर दशरथ शेलार**
व्हा.चेअरमन

**मा.संचालक मंडळ**

---

**सुचना**

१) ज्या सभासदांना माहिती हवी असेल अगर काही सुचना करावयाच्या असतील त्यांनी दि.०४/०८/२०२४ पर्यंत लेखी कळवावे.
२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर कोरम असो वा नसो सभेचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.
३) दि.३१/३/२०२४ चा लेखापरिक्षण अहवाल व आर्थिक पत्रके संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

**सभा वेळेवर सुरू होईल.व सभेनंतर स्नेह भोजनाचा स्वाद घ्यावा.**



ऋणातून समृध्दीकडे
महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)
रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२९९३३०
र.जि.नं.ः एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४० दि.२९/०५/२००१

# ❖ भावपूर्ण श्रध्दांजली ❖

अहवाल वर्षात व आजपर्यंत
सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक,
सांस्कृतिक, कला, सहकार आदी विविध क्षेत्रातील
दिवंगत झालेल्या थोर व्यक्ती, जवान, तंत्रज्ञ, शिक्षणतज्ञ,
कवी, गायक, उद्योजक, संगीतकार, खेळाडू,
कलाकार, शेतकरी, भारतातील नैसर्गिक
आपत्ती,अपघात, पुरग्रस्त , अपघात
दहशतवादी कारवाया इत्यादी
मुळे प्राणास मुकलेले भारतीय
नागरीक व शहीद जवान
तसेच आपल्या पतसंस्थेचे
मान्यवर सभासद व
त्यांचे नातेवाईक
या सर्वांच्या पवित्र स्मृतीस आमची

## भावपूर्ण श्रध्दांजली......

संचालक मंडळ, सभासद व सेवक वृंद



ऋणातून समृध्दीकडे

महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.ः-२९९३३०

र.जि.नं.ः एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४० दि.२९/०५/२००१

# सन २०२३-२०२४ चे नफा वाटणी

**नफा वाटणी ः**

सन २०२३ -२०२४ या आर्थिक वर्षात संस्थेस रू.२०,५०,०००.०० एवढा निव्वळ नफा झालेला असुन संचालक मंडळाने खालीलप्रमाणे नफ्याची वाटणी सुचवली आहे.

| अ.नं | तपशिल | रूपये |
|---|---|---|
| १ | राखीव निधी २५% | ५,१२,५००.०० |
| २ | सभासद लांभाश वाटप | ३,४८,९७९.०० |
| ३ | संशयीत बुडीत NPA तरतुद | २,००,०००.०० |
| ४ | उत्तम जिंदगी तरतुद | ९०,०००.०० |
| ५ | संचालक सेवक प्रशिक्षण निधी | ४०,०००.०० |
| ६ | घसारा तरतुद | ४०,०००.०० |
| ७ | सेवक सानुग्रह अनुदान | १,००,०००.०० |
| ८ | ऑडीट फी खर्च तरतुद | ५०,०००.०० |
| ९ | कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी व्याज देणे | १,५०,०००.०० |
| १० | नफा तोटा चढउतार निधी | ९०,०००.०० |
| ११ | गुंतवणुक चढउतार निधी | ९०,०००.०० |
| १२ | धर्मदाय निधी | ३०,०००.०० |
| १३ | सुरक्षा तरतुद | १,५००.०० |
| १४ | सशस्त्र सेना ध्वज तरतुद | ५,०००.०० |
| १५ | इमारत देखभाल व दुरूस्ती तरतुद | २१,०७८.०० |
| १६ | जाहिरात तरतुद | ५०,०००.०० |
| १७ | इमारत निधी | ९०,०००.०० |
| १८ | इलेक्ट्रीक व इलेक्ट्रॉनिक निधी | ५६,८४४.०० |
| १९ | ठेव अंशदान तरतुद | ८३,०९९.०० |
| २० | व्यवसायकर खर्च पतसंस्था | १,०००.०० |
|  | एकुण | २०,५०,०००.०० |



ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२९९३३0

र.जि.नं.ः एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४0 दि.२९/0५/२00१

सुरक्षितता विश्वासार्हता , आणि तत्परता यांचा त्रिवेणी सुरेख संगम

❖ संचालक मंडळ ❖

## संस्थापक ः श्री.प्रा.निकम टी.पी

| | |
|---|---|
| श्री.तुकाराम पुंडलिकराव निकम | चेअरमन |
| श्री.किशोर दशरथ शेलार | व्हा चेअरमन |
| श्री.डॉ.अरूण पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री.देविदास त्रंबकराव शेलार | संचालक |
| श्री.निवृत्ती दामोदर निकम | संचालक |
| श्री.गोपिनाथ मुरलिधर खैरे | संचालक |
| श्री.मारूती नामदेव गांगुर्डे | संचालक |
| श्री.उमरावसिंग रघुनाथसिंग परदेशी | संचालक |
| श्री.रामदास सदाशिव साळवे | संचालक |
| सौ. साधना भाऊसाहेब शेलार | संचालिका |
| सौ.संगिता कमलाकर शेलार | संचालिका |
| श्री.आण्णासाहेब हरिभाऊ माळी | स्विकृतसंचालक |
| श्री.यशवंत तारू गवारे | स्विकृतसंचालक |
| ॲड.श्री.शिवाजीराव महादु सोनवणे | तज्ञसंचालक |

❖ कर्मचारी वृंद ❖

| | |
|---|---|
| श्री.सतिश मुरलीधर आहेर | मॅनेजर |
| श्री.गजेंद्र बाळु शेलार | कॅशियर |
| श्री.राजेश सुभाष व्यवहारे | लिपीक |
| कु.अश्विनी दशरथ जाधव | लिपीक |
| श्री.सुशिल दिंगबर पंडीत | शिपाई |

| | |
|---|---|
| कायदा सल्लागार | वाहन व्हॅल्युअर |
| ॲड.श्री.शिवाजी महादु सोनवणे | श्री.अभयकुमार आर.मेहता मालेगाव |



ऋणातून समृध्दीकडे
महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)
रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२९९३३०
र. जि. नं.ः एन एस के/सी. एच. डी/आर. एस. आर/सी आर/८४० दि. २९/०५/२००१

# सन २०२४ -२०२५ चे अंदाजपत्रक

| उत्पन्न तपशील | रूपये | खर्च तपशील | रूपये |
|---|---|---|---|
| कर्जावरील मिळणारे व्याज | ८४,००,००० .०० | ठेवीवरील देय व्याज | ८०,००,००० .०० |
| गुंतवणुकीवरील मिळणारे व्याज | ३९,४०,००० .०० | घसारा खर्च | १,२०,००० .०० |
| नोटिस खर्च | ३०,००० .०० | पगार खर्च | १४,००,००० .०० |
| बँक चार्जेस | ५,००० .०० | मानधन खर्च | १,३०,००० .०० |
| रेव्हन्यु टिकट | ५,००० .०० | भविष्य निर्वाह निधी | १,५०,००० .०० |
| एसएमएस चार्जेस | १,००,००० .०० | पोस्टेज व टेलिफोन | ४०,००० .०० |
| आरटिजीएस चार्जेस | १,००० .०० | प्रिटींग व स्टेशनरी | ७०,००० .०० |
| | | किरकोळ खर्च | ३०,००० .०० |
| | | लाईट बिल | ५५,००० .०० |
| | | ऑडीट फी | ७०,००० .०० |
| | | प्रवास खर्च | १५,००० .०० |
| | | CBS सॉफ्टवेअर भाडे खर्च | ६०,००० .०० |
| | | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ५०,००० .०० |
| | | जाहिरात खर्च | ५०,००० .०० |
| | | चांदवड नगरपरिषद कर | ६,००० .०० |
| | | चहापान खर्च | ५०,००० .०० |
| | | दुरूस्ती व देखभाल खर्च | ५०,००० .०० |
| | | वकील फि खर्च | २५,००० .०० |
| | | नफा | २१,१०,००० .०० |
| | १,२४,८१,००० .०० | | १,२४,८१,००० .०० |



ऋणातून समृध्दीकडे
महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)
रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२९९३३०
र. जि. नं.ः एन एस के/सी. एच. डी/आर. एस. आर/सी आर/८४० दि. २९/०५/२००१

## सन २०२३ – २०२४ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेला खर्च

| अ. नं | खर्च तपशील | अंदाजपत्रकाप्रमाणे खर्च | प्रत्यक्ष झालेला खर्च | जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | ठेवीवरील व्याज खर्च | ४५,००,०००.०० | ४८,८२,५१८.०० | ३,८२,५१८.०० |
| ०२ | चहापान खर्च | ३०,७५०.०० | ३२,४९५.०० | १,७४५.०० |
| ०३ | प्रवास खर्च | १०,०००.०० | १९,७६५.०० | ९,७६५.०० |
| | | | | |
| | एकुन.ः– | ४५,४०,७५०.०० | ४९,३४,७७८.०० | ३,९४,०२८.०० |



ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२९९३३०

र. जि. नं.ः एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४० दि.२९/०५/२००१

## सन २०२३ . २०२४
## थकबाकी कर्जदार
## यांचेवर केलेली कार्यवाही यादी

| अ.क्र | कर्ज दिनांक | कर्ज प्रकार | कर्जदाराचे नाव | थकबाकी रक्कम | संस्थेने केलेली कार्यवाही | | दरखास्त | व्याज बंद दिनांक /शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कलम ९८ | कलम १३८ | | |
| १ | २९/०३/२०१६ | नजरगहाण कर्ज | अशोक सावळीराम खैरे | ३,४३,१३४.०० | ९८ | १३८ | दरखास्त | ०१/०४/२०१८ |
| २ | ३१/०३/२०१६ | टर्म लोन | उत्तम कारभारी आहेर | ९,५८,५७८.०० | ९१ | १३८ | दरखास्त | ०१/०४/२०२१ |
| ३ | ०६/०४/२०१७ | सामान्यकर्ज | किरण बाबुराव माळी | १,८५,१२४.०० | - | १३८ | - | निरंक |
| ४ | १७/०४/२०१७ | सामान्यकर्ज | कैलास अर्जुन खैरे | १,४९,५४७.०० | - | १३८ | दरखास्त | ०१/०४/२०२३ |
| ५ | ३०/०३/२०१७ | सामान्यकर्ज | उत्तम सुधाकर शेलार | ९६,८९२.५० | ९८ | - | दरखास्त | निरंक |
| ६ | १७/०४/२०१७ | टर्म लोन | बाळासाहेब पंढरीनाथ रसाळ | ३,३५,९४४.०० | ९८ अर्वाड प्राप्त | १३८ | दरखास्त | निरंक |
| ७ | ०२/११/२०१७ | टर्म लोन | विनायक माधव शिन्दे | ५,०८,७४२.०० | ९८ | १३८ | दरखास्त | ०१/०४/२०२३ |
| ८ | ०३/११/२०१७ | सामान्यकर्ज | आशा सुनिल शेलार | १,५५,२३०.०० | - | १३८ | दरखास्त | निरंक |
| ९ | ०४/०६/२०१८ | सामान्यकर्ज | बाबुराव फकीरा आहेर | १,३८,८१९.०० | - | १३८ | - | निरंक |
| १० | २५/०६/२०१९ | व्य. मॉरगेज कर्ज | संदिप रघुनाथ शेलार | ७,८८,५२९.०० | - | १३८ | - | निरंक |
| ११ | २५/०६/२०१९ | व्य. मॉरगेज कर्ज | रघुनाथ भागुजी शेलार | ३,२४,२६०.०० | ९१ | - | - | निरंक |